गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..
दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS
वर्ष १ ले ● अंक ३२८ वा ● गुरुवार १८ एप्रिल २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-
| * Volume 1 | Issue 328 | Date : 18/04/2024 blow Thursday Page 4 Price 4

## लोकसभा निवडणुकीचा पहिला टप्पा, विदर्भातील पाच मतदारसंघांत उद्या मतदान

नवी दिल्ली: लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात शुक्रवारी (१९ एप्रिल) होणाऱ्या २१ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील १०२ मतदारसंघांमधील प्रचाराची बुधवारी संध्याकाळी सांगता झाली. सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीच्या अनेक वरिष्ठ नेत्यांनी या टप्प्यात मतदारांवर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न केला. पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रात पूर्व विदर्भातील पाच मतदारसंघांत मतदान होणार आहे.



पहिल्या टप्प्यात पूर्व विदर्भातील नागपूर, रामटेक, चंद्रपूर, गडचिरोली आणि भंडारा-गोंदिया या पाच मतदारसंघांमध्ये मतदान होत आहे. पूर्व विदर्भ हा भाजपचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. या पाचही मतदारसंघांत महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी थेट लढत होत आहे. २०१९ च्या निवडणुकीत पाचपैकी चार जागा भाजप-शिवसेना युतीने तर एक जागा काँग्रेसने जिंकली होती. यंदा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार हे ताकदीचे उमेदवार रिंगणात आहेत.

पहिल्या टप्प्यातील प्रचारात राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या प्रचाराची धुरा प्रामुख्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच वाहिली. गेल्या काही दिवसांत मोदी यांनी अनेक मतदारसंघांमध्ये झंझावाती प्रचारदौरे केले. अनेक ठिकाणी जाहीर सभा घेतल्या, रोड शोही केले. मोदी यांनी प्रत्येक सभेत, मतदारांना 'मोदी गॅरंटी'चे आश्वासन दिले. ''सर्व हमींची पुर्तता करण्याचीही मी हमी देत आहे,'' याचा पंतप्रधानांनी जवळपास प्रत्येक सभेत पुनरुच्चार केला. पंतप्रधान मोदी यांच्याबरोबरच । पान २ वर

## जत- कवठेमहांकाळ मार्गावर अपघात; ५ ठार, ५ गंभीर



सांगली : जत मार्गावरील नागज जवळील जांभूळवाडी (ता. कवठेमहांकाळ) येथे क्रूझर आणि ट्रॅव्हल्समध्ये भीषण अपघात होऊन पाच जण ठार, तर सहा जण जखमी झाले. बुधवारी रात्री आठ वाजणेच्या । पान २ वर

## एकनाथ खडसेंना जीवे मारण्याची धमकी

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते एकनाथ खडसे यांना छोटा शकील गँगकडून जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. यासंदर्भात एकनाथ खडसे यांनी जळगावमधील मुक्ताईनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. चार वेगवेगळ्या मोबाईल क्रमांकांवरुन धमकीचे फोन आले असल्याची माहिती एकनाथ खडसे यांनी दिली आहे. जीवे मारण्याची धमकी देणारे फोन चार ते पाचवेळा आले असून या फोनपैकी एक फोन अमेरिकेमधून आल्याचेही एकनाथ खडसे यांनी सांगितले. यानंतर एकनाथ खडसे यांनी पोलिसांत तक्रार दिली आहे. एकनाथ खडसे यांच्या तक्रारीनंतर । पान २ वर

## दीड महिन्यात ४,६५० कोटींची विक्रमी जप्ती



नवी दिल्ली : निवडणुकीमधील गैरप्रकार टाळण्यासाठी रोकड, मद्य आणि अमली पदार्थाच्या अवैध वाहतुकीवर निवडणूक आयोगाची करडी नजर असते. स्थानिक यंत्रणांच्या मदतीने देशभरात केलेल्या कारवायांमध्ये गेल्या दीड महिन्यात तब्बल ४ हजार ६५० कोटींचा मुद्देमाल जप्त झाल्याचे आयोगाने जाहीर सोमवारी जाहीर केले. यात सर्वाधिक, २ हजार ६९ कोटींचे अमली पदार्थ हस्तगत करण्यात आले आहेत. २०१९ साली लोकसभा निवडणुकांदरम्यान निवडणूक आयोगाच्या देखरेखीत ३,४७५ कोटी रुपयांची एकूण जप्ती करण्यात आली होती. यंदा पहिल्या टप्प्याचे मतदान होण्यापूर्वीच हा विक्रम मोडीत निघाला असून एक मार्चपासून दररोज सरासरी १०० कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचा मुद्देमाल यंत्रणांनी जप्त केला आहे. यामध्ये सर्वाधिक, ४५ टक्के वाटा हा अमली पदार्थाचा आहे.काळया पैशाच्या वापरामुळे सर्व उमेदवारांना समान संधी न मिळता अधिक संसाधने असलेला पक्ष किंवा उमेदवाराला अनुकूल परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यामुळे ही जप्ती । पान २ वर

## राज ठाकरे-नरेंद्र मोदी एकाच मंचावर



मुंबई : राज ठाकरे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी एकाच मंचावर दिसतील. लवकरच राज ठाकरे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जाहीर सभा मुंबईतील शिवाजी पार्क मैदानावरती होईल अशी माहिती अमित ठाकरे यांनी पत्रकारांशी अनौपचारिक संवाद साधताना दिली. लोकसभा निवडणुकीसाठी राज ठाकरे यांनी गुढीपाडवा मेळाव्यात जाहीर पाठिंबा दिला होता. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निवडून आणण्याचे आवाहन केले आहे. तसेच लवकरच प्रचार सभा घेण्याचे पण त्यांनी जाहीर केले होते. त्यानंतर आता ही महत्वपूर्ण अपडेट समोर आलेली आहे. अमित ठाकरे सध्या पुणे दौऱ्यावर आहेत. ते प्रभाग निहाय बैठका घेत आहेत. महायुतीला पाठिंबा देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. त्यासाठी पदाधिकाऱ्यांना सूचना करण्यात आल्या आहेत. महायुतीचे काम करण्यासंदर्भात आढावा घेऊन पदाधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. लोकसभा निवडणुकीत मनसेनेच्यावतीने महायुतीला पाठिंबा दिलेला आहे जे मनसे पदाधिकारी पक्षाचे काम करणार नाहीत त्यांच्यावरती कारवाई केली जाईल अशा पद्धतीचा आदेश सुद्धा आता मनसेकडून देण्यात आलेला आहे. त्यामुळे महायुतीसाठी काम न करणाऱ्या पदाधिकाऱ्यांना मनसे दणका देणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## रशियन क्षेपणास्त्र हल्ल्यात युक्रेनमधील १३ जण ठार

नवी दिल्ली: युक्रेनच्या आपत्कालीन सेवेने सांगितले की, या हल्ल्यात दोन मुलांसह किमान ६१ लोक जखमी झाले आहेत. चेर्निहाइव्ह हे राजधानी कीवच्या उत्तरेस १५० किलोमीटर अंतरावर, रशिया आणि बेलारूसच्या सीमेजवळ आहे. पाश्र्चात्य देशांनी युक्रेनला अतिरिक्त लष्करी उपकरणे न दिल्याने रशियाविरुद्धच्या युद्धात त्याची स्थिती कमकुवत होत आहे. युद्ध सुरू होऊन तीन वर्षे झाली आहेत. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी पाश्र्चात्य देशांना आपल्या देशाला अधिक हवाई संरक्षण यंत्रणा पुरवण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी चेर्निहाइव्ह हल्ल्याबद्दल सांगितले की, 'युक्रेनला पुरेशी हवाई संरक्षण उपकरणे मिळाली असती आणि जगाने रशियन दहशतवादाचा मुकाबला केला असता, तर असे झाले नसते.' क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ल्यांपासून बचाव करण्यासाठी युक्रेनकडे हवाई संरक्षण क्षेपणास्त्रे संपली आहेत. अलीकडेच, रशियाने एका हल्ल्यात युक्रेनचा सर्वात मोठा वीज प्रकल्प नष्ट केला.

वॉशिंग्टनस्थित थिंक टँक इन्स्टिटयूट फॉर द स्टडी ऑफ वॉर (आयएसडब्ल्यू) च्या मते, युक्रेनमध्ये । पान २ वर



## काँग्रेसच्या अमेठीतील उमेदवाराबाबत संदिग्धता

नवी दिल्ली : अमेठीतील भाजपच्या उमेदवार व केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांनी वारंवार दिलेले आव्हान स्वीकारून काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी या पारंपरिक मतदारसंघात परतणार की, मेहुणा रॉबर्ट वढेरा यांना संधी देणार याबाबत संदिग्धता कायम राहिली आहे. अमेठीमध्ये २० मे रोजी मतदान होणार असून अखेरच्या क्षणी राहुल गांधी अमेठीतून उमेदवारी अर्ज दाखल करू शकतील असे काँग्रेसच्या नेत्यांचे म्हणणे आहे. मात्र, समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांच्या उपस्थितीत बुधवारी झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेमध्ये राहुल गांधींनी अमेठीतील उमेदवारीचा प्रश्र्न गुलदस्त्यात ठेवला. 'मी काँग्रेसचा निष्ठावान कार्यकर्ता असून उमेदवारीसंदर्भातील निर्णय पक्षाच्या केंद्रीय निवड समितीमध्ये घेतले जातात. समितीचा निर्णय मला मान्य असेल', असे राहुल गांधी यांनी सांगितले.



उत्तर प्रदेशमधील ८० जागांपैकी ६३ जागा 'सप' तर, काँग्रेस १७ जागा लढवत आहेत. । पान २ वर

## नांदेड जिल्ह्यात खर्च निरीक्षक डॉ. जांगिड यांच्याकडून रात्री उशिरा नाक्यांची तपासणी

नांदेड : नांदेड लोकसभा निवडणुकीसाठी केंद्रीय निवडणूक आयोगामार्फत नियुक्त खर्च निरीक्षक डॉ. दिनेश कुमार जांगिड यांनी रात्री उशिरा आकस्मिक भेटी देऊन अनेक नाक्यांची तपासणी केली. त्यांच्या या भेटीमुळे यंत्रणा सतर्क झाली असून मोठ्या प्रमाणात नाकेबंदी केली जात आहे. लोकसभा आचारसंहिता लागल्यानंतर सर्वात प्रथम आलेले खर्च निरीक्षक डॉ.जांगिड यांनी आपल्या अचानक दौऱ्यातून नांदेड शहर, भोकर, मालेगाव, कासारखेडा आदी ठिकाणच्या विविध स्थानिक निगराणी दलांच्या कामकाजाचा आढावा घेतला. याशिवाय भरारी पथक नेमके काय काम करत आहेत, याबाबतही त्यांनी चौकशी केली.नांदेड लोकसभा क्षेत्रामध्ये आतापर्यंत मोठ्या प्रमाणात नगदी रोकड, सोने, चांदी, मद्य व मादक पदार्थ व अन्य काही भेटवस्तू जप्त करण्यात आले आहे. डॉ.जांगिड यांच्याकडून वेळोवेळी अशा प्रकारे अचानक पाहणी केली जात असल्यामुळे निवडणूक काळातील तपासणी पथके जागृत झाली आहेत. जिल्ह्यात सध्या २५ निगराणी केंद्र आहेत. ज्या ठिकाणी २४ तास वेगवेगळ्या वाहनांची तपासणी केली जाते. या काळात नगदी रक्कम, मादक पदार्थ, मद्य याची तस्करी प्रतिबंधित केली जाते. अशाच प्रकारच्या ६० फिरत्या पथकांकडून मोठ्या प्रमाणात तपासणी सुरू आहे. फिरत्या पथकाकडून देखील अशा प्रकारच्या कोणत्याही गैरप्रकारावर नियंत्रण ठेवले जात आहे.



## श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या आशीर्वादाने मी खासदार होणार: आ. प्रणिती शिंदे

पंढरपूर/प्रतिनिधी: आज रामनवमीचे निमित्ताने सोलापूर लोकसभा मतदारसंघाचे इंडिया आघाडीचे उमेदवार प्रणिती शिंदे या आपल्या प्रचाराच्या रामनवमीच्या औचित्य साधून त्यांनी आपल्या प्रचाराचा नारळ श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन घेऊन नामदेव पायरी येथे प्रचाराचा नारळ फोडून शुभारंभ केला

. यावेळी प्रणिती शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना त्या म्हणाले की श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे आशीर्वाद त्याचप्रमाणे सोलापूर लोकसभा मतदारसंघातील श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या स्वरूपात असलेले जनता जनार्दन यांच्या आशीर्वादाने मी खासदार होणार आणि सर्वसामान्य शेतकरी कष्टकरी कामगार रोजगार यांची प्रश्र्न सोडवणार सोलापूर लोकसभा मतदारसंघाचा जो विकास रखडला आहे आहे तो विकास पूर्णत्वास नेण्याचे दे माझे असून सोलापूर जिल्ह्यातील भेडसावणारा पाणी प्रश्र्न सोडवणार असून बेरोजगारांच्या हाताला एमआयडीसीच्या माध्यमातून रोजगार मिळवून देण्याचे कार्य आहेत

. आतापर्यंत सोलापूर लोकसभा मतदारसंघांमध्ये विविध तालुक्यांमधून माझा गाव भेटीचा दौरा हा सुरू आहे या दौऱ्यापासून मला सर्वसामान्य जनतेमधून वंचित बहुजन समाज त्याचप्रमाणे विविध सामाजिक संघटना विविध जाती जमाती मधून मला मोठ्या प्रमाणामध्ये प्रतिसाद मिळत असून त्यांच्या आशीर्वादाने मी या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये विजय होणार असे त्यांनी सांगितले



प्रचाराचा शुभारंभ प्रसंगी उपस्थित श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याची चेअरमन अभिजीत पाटील सुधाकरपंत परिचारक पतसंस्थेचे चेअरमन प्रकाश तात्या पाटील शिवसेनेची साईनाथ अभंगराव शिवसेनेचे संभाजी शिंदे तसेच विविध पक्षाचे कार्यकर्ते नेते मंडळी मोठ्या संख्येने आज उपस्थित होते

## संगमनेरला अवकाळीचा झटका

संगमनेर : संगमनेर शहर व परिसरात मंगळवारी (दि १५ ) रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास अचानकवादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने नागरिकाची एकच धांदल उडाली ,सुसाट्याचा वारा व पाऊस यामुळे काही ठिकाणी शेतीचे,अंबा पिकाचे मोठे नुकसान झाले तर वातावरणात काहीसा गारवा निर्माण झाला. गेल्या पंधरादिवसापासून उकाड्याने नागरिक हैराण झाले होते. सकाळी १० वाजता उन्हाचा तडाखा बसत आहे यामुळे नागरिक बेजार झाले आहे. दरम्यान राज्यातील अनेक भागात अवकाळी पाऊसने हजेरी लावल्याने संगमनेर शहर व तालुक्यातील पाऊस पडले असा अंदाज व्यक्त करण्यात येत होता.काल मोठ्या प्रमाणावर उन्हाने त्रस्त झालेले नागरिकान रात्री झालेल्या अवकाळी पावसाने काहीसा दिलासा मिळाला. रात्री अचानक वारा पाऊस सुरू झाल्यामुळे शेतकऱ्याची धावपळ उडाली. सध्या एप्रिलमध्येच उन्हाचा कड्याक्याने मागील अनेक वर्षांचा रेकॉर्ड मोडला आहे यंदाचा उन्हाळा अधिकच त्रासदायक असणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने आधीच वर्तवला आहे प्रचंड

## संपादकीय

### उष्णतेची लाट आणि पाणी..

हवामान खात्याने इशारा दिला आहे की, तापमान आता ४० डिग्रीच्या वर जाण्याची शक्यता आहे. या इशाऱ्यातच भावी दुष्काळाचे गर्भित सावट आहे. कारण अजून दुष्काळाची परिस्थिती नसली तरीही ग्रामीण भागात दुष्काळ आणि पाण्याची टंचाई ही संकटे दबक्या पावलांनी येत आहेत. टँकर लॉबी सक्रिय झाली आहे आणि त्यांचा धंदा जोरात होण्यास सुरुवात झाली आहे. सोलापूर व परिसरातील तापमानात दिवसेंदिवस वाढ होत आहे. वाढत्या उन्हामुळे जनजीवन विस्कळीत बनले असून सकाळी दहानंतर घराबाहेर पडणे मुश्कील बनलेआहे. सध्याच उन्हाच्या काहिलीने अंग होरपळत आहे आणि अजून तर मे महिनाही जायचा आहे.

भारतात उष्णतेच्या प्रकोपाचा प्रश्न दरवर्षी असतो आणि ग्रामीण भागात तर त्याची तीव्रता इतकी प्रचंड असते की महिला, मुली डोक्यावर हंडे घेऊन मैलोन्‌मैल पायपीट करत जाऊन पाणी आणत असतात. हवामानातील सातत्याच्या बदलामुळे तापमान प्रचंड वाढत आहे आणि यालाच काही शास्त्रज्ञ ग्लोबल वॉर्मिंग म्हणतात. हवामानातील सातत्याने होणाऱ्या बदलाचा खरा फटका नेहमी शेतकऱ्यांना बसतो. आता मे महिनाही आला नाही तोच राज्यात अनेक भागांत उभी पिके उन्हात जळून गेल्याच्या बातम्या येत आहेत. ग्रामीण भागात पाण्याची टंचाई याच महिन्यात होते आणि लोक पाणी पाणी करत असतात. मराठवाडा, विदर्भ या कायम दुष्काळी भागात दहा किंवा वीस दिवसांनी पाणी येते. हे दरवर्षी दिसणारे चित्र आहे आणि ते बदलले पाहिजे. पण ग्रामीण भागातील पाण्याचा प्रश्न अतिगंभीर होण्याचे कारण म्हणजे बहुतेक लोक पाण्याच्या दैनंदिन गरजांसाठी भूजलावर अवलंबून राहतात. पाण्याचा बेसुमार उपसा सुरू असतो आणि अनेक तज्ज्ञांनी भूजलाचा स्तर खाली खाली जात असल्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. पण सरकारने आणि स्वयंसेवी संस्थांनीही भूजलाचा कमी उपसा करण्यासाठी त्यांचे मन वळवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पण दुर्दैवाने तसे होत नाही आणि पाण्यासाठी वणवण भटकण्याची वेळ येते. भारतीय हवामान खात्याने जो उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे, तो संपूर्ण भारतासाठी गंभीर आहे. या उष्णतेच्या लाटेमुळे अनेक दुष्परिणाम होणार आहेत आणि त्यात लोक आजारी पडणे, दुष्काळ, पाण्याची टंचाई निर्माण होणे आणि विजेची मागणी वाढणे अशा अनेक उपसंकटांचा समावेश आहे. आताच अगदी राज्याच्या अनेक भागांत दुष्काळाच्या झळा सुरूच झाल्या आहेत, तर अनेक ठिकाणी पाण्याचे दुर्भिक्ष जाणवू लागले आहे.

# महिला उद्धारक बाबासाहेब आंबेडकर !

भाग १

आचार्य अत्रे म्हणजे मराठी साहित्यातील बहुआयामी व्यक्तिमत्त्व. त्यांच्या डोक्यातील विचार कागदावर उतरले म्हणजे ती 'पत्थर की लकीर' ठरायची.तसे बाबासाहेब आंबेडकरांशी आचार्यांचे अनेक विषयांवर वैचारिक मतभेद होते तरी देखील बाबासाहेबांविषयी आचार्य अत्रे म्हणतात

आंबेडकरांनी अपार मेहनत घेऊन लिंगभेद आणि जातीभेद विचारात न घेता मानवतेच्या दृष्टिकोनातून तौलेनिक अभ्यास करून तमाम भारतीय महिलांचा तसेच हिंदू धर्मातील महिलांचे स्थान आणि स्तर यांना डोळ्यासमोर ठेवून तयार केलेले 'हिंदू कोड बिल' जर मान्य झाले असते, तर हिंदु समाजातील सर्व भेद, अन्याय आणि विषमता नष्ट होऊन हिंदु समाज हा तथागत गोतम बुद्धांच्या समानतेच्या तत्व आणि आधारावर जगातील एक अत्यंत तेजस्वी आणि बलशाली भारत झाला असता. आणि भारताच्या हजारो वर्षांच्या इतिहासात जी क्रांती आजपर्यंत घडली नव्हती ती घडून आली असती. पण दुर्दैव आणि दुर्भाग्य भारताचे पर्यायाने हिंदुसमाजाचे की,आंबेडकरांनी देवदूतासारखा पुढे केलेला हात पूर्वग्रहदूषित आणि सडकी विचारसरणी वृत्तीच्या धर्म मार्तंडाच्या आग्रही विरोधामुळे तत्कालीन कारभा-यांनी झिडकारला आणि स्वतःचा घात करुन घेतला.पुढे जावून आचार्य म्हणतात, अख्या मानवजातीला विशेषतः महिला वर्गाला कलंक लावणारे मनुचे कायदे गाडून टाकून तथागत गोतम बुद्धांच्या तत्वावर आधारित स्वातंत्र्य समता आणि विश्र्वबंधुत्व जपणारा नवा समाज निर्माण करण्याचा अहोरात्र ध्यास घेऊन प्रत्यक्षात सतत कृतीशील असणा-या बाबासाहेब डॉ भीमराव आंबेडकरांनी सर्व धर्मीय तमाम महिलांच्या उद्धारासाठी 'हिंदू कोड बिल' च्या माध्यमातून जे महान उपकार केले आहेत त्या उपकाराचे कर्ज आणि त्याचे व्याज मरेपर्यंत न फिटणारे आहे. यांची जाणीव आज महिला का ठेवत नाहीत हेच मुळात मोठं गूढ आहे.खरच याविषयी आंबेडकरांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शब्द अपुरे आहेत.असो !



बाबासाहेबांनी सतत ४ वर्षे १ महिना २६ दिवस इतक्या कालावधीत दिवसरात्र एक करत अविरत कष्ट करून महत्प्रयासाने कोणतीही जात-पात, धर्म-पंथ असा कोणताही संकुचित भाव मनी न ठेवता भारतातील तमाम महिला वर्गाच्या न्यायिक हक्क आणि अधिकारासाठी हिंदू कोड बिल तयार केले होते. हे बिल पारित होणे तर दूरच.मुळात बाबासाहेबांना ते बिल संसदेत मांडताच येऊ नये अशी व्यूहरचना करुन अभूतपूर्व असा गोंधळ निर्माण करण्यात आला होता. इतर मागासवर्गीयांच्या अर्थात ओबीसींच्या आरक्षणाला होणा-या विरोधाने आधिच व्यथित झालेल्या बाबासाहेबांना महिला कल्याण विषयी महत्वाचे असे बिल देखील मांडण्यात अडथळे निर्माण केल्याच्या निषेधार्थ मानी स्वभावाच्या बाबासाहेब डॉ.भिमराव आंबेडकरांनी आपल्या मंत्रीपदाला आणि तेही कायदेमंत्रीपदा सारख्या वजनदार मंत्रीपदाला ठोकर मारण्याचा दृढनिश्र्चय केला.जे मिळवायचे म्हणून सर्वजण राजकारणात येऊन वाटेल ते करण्याची आयुष्यभर शिकस्त करत असतात अशा मंत्रीपदावर आंबेडकरांनी लाचारी न पत्करता आपली सदसद्विवेकबुद्धी जागृत ठेवून आणि स्वाभिमानाची जपणूक करत पाणी सोडले होते.

बाबासाहेबांनी भारतीय संविधान निर्मितीचे ऐतिहासिक कार्य केले होतेच. ज्या तत्त्वांचा, मूल्यांचा त्यांनी संविधानात जोरदार पुरस्कार केला त्याच तत्वांना मूठमाती देणे त्यांच्यासारख्या विचारी नि विवेकनिष्ठ महापुरुषाला कसे शक्य होईल ? हिंदू कोड बील लोकसभेत मंजूर झाले नाही म्हणून डॉ. बाबासाहेबांनी कायदे मंत्री पदावर लाथ मारून राजीनामा मंत्रीमंडळासमोर फेकून दिल्याचे भारतातील ते पहिलेच उदाहरण होते. त्याचवेळी हे विधेयक पास झाले असते आणि महिलांनाही समान हक्क आणि दर्जा मिळाला असता तर आज भारत जगात ताकदीने महासत्ता म्हणून ताठ मानेने उभा राहिला असता. तसे हे बिल प्रथमतः २४ फेब्रुवारी १९४९ रोजीच संसदेत चर्चेसाठी मांडले गेले होते.डॉ आंबेडकर यांनी हिंदू कोड बिलाविषयी म्हटले होते की...

हिंदू कोड बिलाला मी इतकं महत्त्व देतो की, समाजातल्या वर्गा वर्गातील असमानता, स्त्री-पुरुष यांच्यातली असमानता तशीच अस्पर्शित राहू देऊन, आर्थिक समस्यांशी निगडित कायदे संमत करीत जाणे म्हणजे आमच्या संविधानाची चेष्टा करणे आणि शेणाच्या ढिगाऱ्यावर राजमहाल बांधण्यासारखे होईल.

वास्तविक बाबासाहेबांच्या मते भारतीय महिला वर्गाच्या आयुष्यातील तो एका सूवर्णयुगाच्या प्रारंभाचा संस्मरणीय दिवस ठरला असता. परंतु हेच तर मनुवादींना नको होते म्हणून त्यांनी तसे होऊ दिले नाही.

डॉ.आंबेडकरांनी अतिशय विचारपूर्वक आणि धाडसाने मांडलेले हिंदू कोड बिलभारताचे प्रधानमंत्री नेहरू यांना कुणाच्याही का दबावाने होईना पण बहुमत असूनही ते पारीत करून घेता आले नाही.होईलच कसे ? ढोल गवार शूद्र पशू नारी,सकल ताडन के अधिकारी! असा स्त्रियांना केवळ उपभोगत वस्तू समजून दुय्यम प्रतीचा दर्जा आणि सामाजिक, राजकीय आणि आर्थिक अधिकार नाकारणारी विचारसरणी असलेल्या विषमतावादी हिंदू संस्कृतीत हिंदू धर्माच्या, स्त्रियांबद्दलच्या अनिष्ट रूढी आणि बंधने झुगारून देऊन स्त्री-पुरुष समानतेचा योग्य सन्मान मिळवून देण्याचा प्रयत्न या हिंदू कोड बिल च्या माध्यमातून होणार असल्याने हा बदल हिंदू धर्म मार्तंडांच्या सहनशीलता तर दूरची गोष्ट असा साधा विचारही मनात आणण्याच्या पलीकडचा होता.म्हणून हे हिंदू कोड बिल पारित होणे तर दूरच, लोकसभेच्या पटलावरही ते मांडता आले नाही.जरी त्या दिवशी बिल मांडले गेले नाही आणि एक सुवर्ण संधी भारतीय महिलांच्या दृष्टीने गमावली गेली असे जरी घडले तरी वणवा पेटण्यासाठी जशी एखादी चिंगारी देखील पुरेशी असते तसेच त्यादिवशीही तेच घडले हे आज देशातील महिलांच्या सर्वच क्षेत्रातील यशाकडे पाहिल्यावर म्हणता येईल.

स्त्रियांना कायद्याने हक्क, दर्जा आणि प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचे बीज रोवण्याचे, एक सुंदर सुवर्ण स्वप्न बाबासाहेबांनी हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून पाहिले होते. एवढे महान कार्य होऊन देखील आज सुद्धा प्रसारमाध्यमे आणि स्त्रीवादी लेखक / लेखिका सोयीस्कररीत्या बाबासाहेबांच्या या एकहाती लढ्या बद्दल कृतज्ञता व्यक्त करत नाहीत, मोकळेपणाने लिहित नाहीत. बाबासाहेबांना एक राष्ट्र निर्माते म्हणून न मानता त्यांना फक्त दलितांचा उद्धारक असे मर्यादितपणे संबोधून भारतीय समाजावर कायमचे बिंबवण्याचे षडयंत्र हे मनुवादी विचारसरणी असलेली प्रसारमाध्यमे करत असतात.

डॉ. आंबेडकरांनी मांडलेल्या हिंदू कोड बिलाविषयी ओझरती माहिती जाणून घ्यायची झाली तर प्रथमतः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आपण सर्वजण जसे ओळखतो ते भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार हे जरी निर्विवाद सत्य असले तरी पुढे जाऊन केवळ दलितांचे कैवारी म्हणून जे संबोधतो ते पूर्णपणे चुकीचे आहे. कारण त्यांचे कर्तृत्व एवढ्याच पुरतं मर्यादित नाही. डॉ.आंबेडकरांनी जात-धर्म, लिंगभेद न मानता भारतातील तमाम स्त्रियांवर अनेक उपकार करून ठेवले आहेत. भारतीय स्त्रियांच्या जीवनात क्रांतिकारी बदल आणू पाहणा-या हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून त्यांनी केलेल्या कार्याची म्हणावी तशी दखल आपल्या भगिनीवर्गाने घेतलेली नाही.

स्वतंत्र भारताचे पहिले कायदे मंत्री म्हणून बाबासाहेबांची इच्छा होती कि तमाम स्त्रियांना या जाचक रूढी आणि परंपरा मधून मुक्त करावे आणि ते आपले कर्तव्य आहे असे समजून त्यांनी हिंदू कोड बिल तयार करून कायद्याने हक्क, दर्जा आणि प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचे स्वप्न त्यांनी हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून पाहिले होते. हे बिल सात वेगवेगळ्या घटकांशी निगडित कायद्याचे कलमात रूपांतर करू पाहणारे होते. हे सात घटक खालीलप्रमाणे-

**✻ जी व्यक्ती मृत्युपत्र न करता मृत पावली असेल अशा मृत हिंदू व्यक्तीच्या (स्त्री आणि पुरुष दोघांच्याही) मालमत्तेच्या हक्कांबाबत.**

✻ मृताचा वारसदार ठरवण्याचा अधिकार

✻ पोटगी

✻ विवाह

✻घटस्फोट

✻ दत्तक विधान

✻ अज्ञानत्व व पालकत्व.

हे सातही विषय स्त्रियांच्या दृष्टीने किती महत्त्वाचे आहेत हे वेगळे सांगायला नकोच ! भारतीय संविधान परिषदेने जात, धर्म किंवा लिंगभेद करून मानवप्राण्यात कायदा भेदाभेद करणार नाही, न्यायाच्या तराजूत सर्वांना एकाच मापात तोलले जाईल, अशी घोषणा करून स्वातंत्र्य व समता या तत्त्वांचा अंगीकार केलेला होता. या पार्श्र्वभूमीवर हिंदू स्त्रियांना त्याचे न्याय्य हक्क देण्यास विरोध झाला, हे अतिशय दुर्दैवी होते. या बिलातील घटस्फोट, द्विभार्या या कलमांना सनातनी । **क्रमश :**

पान १ वरुन

## लोकसभा निवडणुकीचा पहिला..

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्यासह मंत्रिमंडळातील त्यांच्या अनेक सहकाऱ्यांनी राओलाच्या उमेदवारांचा प्रचार केला. तर इंडिया आघाडीच्या उमेदवारांचा प्रचार प्रामुख्याने काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे आणि खासदार राहुल गांधी यांनी केला.

समाजातील विविध घटकांसाठी राबवलेल्या कल्याणकारी योजनांवर आधारित तयार केलेल्या भाजपच्या जाहिरनाम्यात 'मोदी हमी'चा समावेश केला आहे. एक राष्ट्र, एक निवडणूक, समान नागरी कायदा या गेल्यावेळच्या निवडणुकीतील आश्र्वासनांचाही यावेळी पुनरुच्चार केला आहे. भाजपच्या 'मोदी हमी'ला काँग्रेसने आपल्या 'न्यायपत्र' या जाहिरनाम्याद्वारे उत्तर दिले. काँग्रेसने न्यायपत्राद्वारे २५ हमी दिल्या आहेत. त्यांत आरक्षणाची मर्यादावाढ, एमएसपीचा कायदा, जातनिहाय जनगणना, अग्निपथ रद्द करणे आदी आश्र्वासने दिली आहेत.

## जत- कवठेमहांकाळ मार्गावर

सुमारास अपघात घडला असून जखमींना मिरेजीतील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.अपघातग्रस्त कर्नाटकमधून सावर्डे (ता. तासगाव) येथे लग्नासाठी निघाले होते. लग्नाला निघालेल्या क्रूझर गाडीने उभ्या असलेल्या ट्रॅव्हल्सला मागून धडक दिली. या अपघातात ५ जण जागीच ठार झाल्याची माहिती असून ४ ते ५ जणांची प्रकृती गंभीर आहे. पोलीस अपघातग्रस्तांची माहिती घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. क्रूझर मध्ये एकूण १४ ते १५ जण असल्याची प्राथमिक माहिती आहे.

## दीड महिन्यात ४,६५० कोटींची

म्हणजे लोकसभा निवडणुका आमिषांशिवाय आणि निवडणूकविषयक गैरप्रकारांशिवाय पार पाडण्याच्या, तसेच सर्वांसाठी समान संधी सुनिश्र्चित करण्याच्या आपल्या संकल्पाचा महत्त्वाचा भाग आहेत, असे आयोगाने म्हटले आहे. अमली पदार्थांची जप्ती ही यावर्षी जानेवारी व फेब्रुवारीत करण्यात आलेल्या एकूण जप्तीच्या ७६ टक्के असून, निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर होण्याच्या बऱ्याच आधी आयोगाने या धोक्यावर लक्ष केंद्रित केले होते.

तृणमूल काँग्रेसचे नेते अभिषेक बॅनर्जी यांच्या हेलिकॉप्टरची तपासणी करण्याचे निवडणूक आयोगाने समर्थन केले आहे. निवडणूक काळात कोणत्याही नेत्याचे हेलिकॉप्टरसह कोणतेही वाहन तपासणे ही नियमित प्रक्रिया असल्याचे आयोगाने म्हटले आहे. दोन दिवसांपूर्वी हेलिकॉप्टरच्या तपासणीवरून बॅनर्जी यांनी आयोगावर टीका केली होती.

## एकनाथ खडसेंना जीवे मारण्याची

पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला असल्याची माहिती आहे. छोटा शकीलचे नाव सांगत आम्ही तुम्हाला मारु, अशी धमकी फोनवरुन देण्यात आल्याचे एकनाथ खडसे यांनी माध्यमांना सांगितले. तसेच फोन आल्याचे क्रमांक ट्रेस केले असता त्यातील एक फोन अमेरिकेवरुन आल्याचे दिसते असे सांगत या धमकीमागे राजकीय संबंध नसल्याचे आपल्याला वाटते. तसेच पोलिस तपासातून यातील तथ्य बाहेर येईल, असे एकनाथ खडसे यांनी सांगितले आहे. याबाबत गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष घालावे, असेही खडसे म्हणाले. एकनाथ खडसे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटामधून लवकरच भारतीय जनता पक्षात प्रवेश करणार असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात आहेत. यासंदर्भात एकनाथ खडसे यांनी काही दिवसांपूर्वीच प्रतिक्रिया देत आपण लवकरच पुन्हा भारतीय जनता पक्षात जाणार असल्याचे सांगितले होते. यासंदर्भात एकनाथ खडसे यांनी भाजपाच्या दिल्लीतील वरिष्ठ नेत्यांच्या भेटीदेखील घेतल्या होत्या.

## काँग्रेसच्या अमेठीतील ..

अमेठी व रायबरेली या दोन्ही जागा काँग्रेसला देण्यात आल्या आहेत. अमेठीमधून लोकसभेची निवडणूक लढवण्याची इच्छा प्रियंका गांधी यांचे पती रॉबर्ट वढेरा यांनी व्यक्त केली आहे. गांधी कुटुंबातील सदस्याने अमेठीतून निवडणूक लढवावी असे स्थानिकांचे म्हणणे असल्याचे मत वढेरा यांनी व्यक्त केले होते. मात्र अमेठीतून राहुल गांधी यांनी लढावे असे उत्तर प्रदेशातील काँग्रेस नेत्यांचे म्हणणे आहे.

लोकसभा निवडणुकीत भाजपची मजल दीडशे जागांपर्यंत जाईल असा दावा काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला आहे. समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांच्यासह घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत त्यांनी भाजपवर टीकास्त्र सोडले. जागांचे भाकीत मी वर्तवत नाही. साधारण पंधरा दिवसांपूर्वी भाजप १८० जागा जिंकेल असा माझा अंदाज होता. ,मात्र आता त्यांना दीडशेच जागा मिळतील अशी स्थिती आहे असे राहुल यांनी नमूद केले. प्रत्येक राज्यात काँग्रेसची कामगिरी सुधारत असल्याचे अहवाल असल्याचे त्यांनी सांगितले. उत्तर प्रदेशात आमची भक्कम आघाडी आहे.

## रशियन क्षेपणास्त्र हल्ल्यात ..

लष्करी उपकरणे झपाट्याने कमी होत आहेत. युक्रेनला दिल्या जाणाऱ्या अमेरिकेच्या लष्करी मदतीच्या तरतुदीत विलंब झाल्यामुळे रशिया वेगाने प्रगती करत आहे. अमेरिकेच्या मदतीशिवाय युक्रेन युद्धभूमीवर फार काळ टिकू शकत नाही, असे आयएसडब्ल्यू मंगळवारी प्रसिद्ध केलेल्या अहवालात म्हटले आहे.

# घडयाळाचे काटे उलटे फिरवू नका! मतपेटीद्वारे गुप्त मतदानाच्या पर्यायावर सर्वोच्च न्यायालयाची टिप्पणी

नवी दिल्ली : मतदानयंत्राबरोबर जोडलेल्या सर्व 'व्हीव्हीपॅट'चीही (कागदी मत पडताळणी) मोजणी करण्याच्या मागणीवरील सुनावणीदरम्यान मंगळवारी सर्वोच्च न्यायालयाने मतपेटीद्वारे गुप्त मतदानाच्या पर्यायामधील मानवी हाताळणीतील समस्या अधोरेखित करत घडयाळाचे काटे उलटे फिरवण्यावर आक्षेप नोंदवला.

निवडणूक मतदानयंत्राद्वारे मतदाराने मत दिल्यानंतर 'व्हीव्हीपॅट' जोडलेल्या मशीनवर मताची कागदी पावतीही उपलब्ध होते. ही कागदी पावती मतदारांच्या हातात दिली जात नाही. मात्र, ही पद्धत बदलून कागदी पावती मतदारांना मतपेटीमध्ये टाकण्याची परवानगी दिली पाहिजे व मतमोजणीच्या दिवशी मतदानयंत्रे व कागदी पडताळणी एकाच वेळी झाली पाहिजे, असे मुद्दे 'असोसिएशन फॉर डेमोक्रेटिक रिफॉर्म' (एडीआरम्) या संस्थेच्या वतीने ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण यांनी मांडले. लोकसभा निवडणुकीसाठी पहिल्या टप्प्यातील मतदान १९ एप्रिल रोजी होत असून 'व्हीव्हीपॅट'संदर्भातील न्या. संजीव खन्ना व न्या. दीपंकर गुप्ता यांच्या खंडपीठासमोर पुढील सुनावणी १८ एप्रिल रोजी होणार आहे.

मतपेटीतील कागदी पावत्यांच्या मोजणीच्या भूषण यांच्या मुद्दयावर आक्षेप नोंदवत न्या. संजीव खन्ना यांनी, देशातील निवडणुकांमध्ये मतदानयंत्रांचा वापर होण्याआधी मतपेटीतील गुप्त मतदानपद्धतीत होणाऱ्या गैरप्रकारांचा पाढा वाचला. मतदान केंद्रांचा ताबा घेऊन बोगस मतदान कसे होत होते हे आम्ही विसरलो नाही, असे न्या. खन्ना म्हणाले. मतदानयंत्रामध्ये जाणीवपूर्वक फेरफार केले गेले तर, मतदान व मतमोजणीमध्ये समस्या निर्माण होऊ शकते. या मुद्दयांच्या अनुषंगाने युक्तिवादावर भर देण्याची सूचना खंडपीठाने याचिकाकर्त्यांच्या वकिलांना केली.

मतदानयंत्रांमध्ये फेरफार केला जाऊ शकतो, असा मुद्दाही भूषण यांनी मांडला. सलग दोन मते एकाच पक्षाला दिली गेली तर, 'व्हीव्हीपॅट'मध्येही फेरफार होऊ शकतो. एक मत एका पक्षाला तर दुसरे मत अन्य पक्षाला विभागले जाऊ शकते. मतदानयंत्रांच्या विश्र्वासार्हतेवर शंका घेता येते. ही मतदानयंत्रे 'ईसीआयएल' आणि 'भेल' या दोन सरकारी कंपन्या तयार करतात, या कंपनीमधील काही संचालक भाजपचे सदस्य आहेत, असा संदर्भ देत भूषण यांनी 'व्हीव्हीपॅट'मधील कागदी पावत्या मतदारांना मतदानपेटीमध्ये टाकण्याचे स्वातंत्र्य दिले पाहिजे, असा युक्तिवाद केला.

मतदानयंत्रातील मत व मतपेटीतील कागदी मत एकाच वेळी मोजले गेले तर मतमोजणी निर्दोष होईल. लोकसभा निवडणूक सहा आठवडे घेतली जात असून मतमोजणीसाठी आणखी एक दिवस घेतला तर फारसे बिघडणार नाही, असे भूषण यांचे म्हणणे होते. आत्ता लोकसभा मतदारसंघातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघामधील फक्त ५ 'व्हीव्हीपॅट'ची मोजणी केली जाते. एकूण २ टक्के 'व्हीव्हीपॅट'ची मोजणी ही अत्यल्प ठरते. त्यामुळे सर्व 'व्हीव्हीपॅट'ची मोजणी केली पाहिजे, असा मुद्दाही मांडण्यात आला. मतदानपेटीतील कागदी पावत्या मोजण्याच्या पर्यायावर न्या. खन्ना यांनी, मानवी हाताळणीमुळे मतमोजणीमध्ये समस्या निर्माण होऊ शकतात असे मत व्यक्त केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# महायुतीच्या उमेदवार अर्चना पाटील, राम सातपुते यांचाही पाठिंबा

## प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाला ग्वाही



सोलापूर/प्रतिनिधीः महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाने वृत्तपत्रांना ऊर्जितावस्था मिळवून देण्यासाठी केंद्र सरकारकडे वृत्तपत्र खरेदी करणार्यांना उत्पन्न करात वार्षिक ५ हजार रुपये सूट द्यावी, ही मागणी लावून धरली आहे. धाराशिव लोकसभेच्या महायुतीच्या उमेदवार अर्चनाताई राणा जगजितसिंह पाटील आणि सोलापूर लोकसभेचे महायुतीचे उमेदवार राम सातपुते यांनीही पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या मागणीला पाठिंबा दिला आहे.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्यावतीने प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने धाराशिव लोकसभेच्या महायुतीच्या उमेदवार अर्चनाताई राणा जगजितसिंह पाटील, सोलापूर लोकसभेचे महायुतीचे उमेदवार राम सातपुते यांची भेट घेऊन चर्चा केली. कोरोना वैश्विक महामारीनंतर महाराष्ट्रासह संपूर्ण देशात वृत्तपत्र व्यवसायावर मोठा परिणाम झाला. वृत्तपत्र खप आणि जाहिरातींचे प्रमाणही कमी झाले आहे. परिणामी वृत्तपत्र व्यवसायावर अवलंबून असलेले पत्रकार आणि इतर कर्मचार्यांसमोर रोजगाराचाच प्रश्न निर्माण झाला आहे. देशभरात छोट्या-मोठ्या वृत्तपत्रांचा ३५ हजार कोटी रुपयांचा व्यवसाय अडचणीत आला आहे. यासाठी केंद्र सरकारने वृत्तपत्र खरेदी करणार्या आयकरदात्यांना उत्पन्न करात वार्षिक ५ हजार रुपयांची सूट द्यावी, अशी मागणी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केली. या मागणीला धाराशिव लोकसभेच्या महायुतीच्या उमेदवार अर्चनाताई राणा जगजितसिंह पाटील, सोलापूर लोकसभेचे महायुतीचे उमेदवार राम सातपुते यांनी पाठिंबा देत या निवडणुकीत आपला विजय झाल्यास लोकसभेत हा विषय प्राधान्याने मांडला जाईल, असे अभिवचन दिले. यावेळी पत्रकार संघाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी, राज्य कार्यकारणी सदस्य बाबासाहेब देशमाने, पत्रकार संघाचे धाराशिव जिल्हाध्यक्ष धनंजय पाटील, पत्रकार संघाचे धाराशिव येथील पदाधिकारी श्रीराम क्षीरसागर, रामेश्वर डोंगरे, सय्यद कलीम मुसा यासह पत्रकार उपस्थित होते.

### राज्यातील १०० उमेदवारांना पत्रकार संघ देणार निवेदन : वसंत मुंडे

केंद्र सरकारने वृत्तपत्र खरेदी करणार्यांना उत्पन्न करात वार्षिक ५ हजार रुपये सूट द्यावी, ही मागणी केंद्र सरकारकडे लावून धरली आहे. या मागणीला लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात असलेल्या उमेवारांकडून पत्रकार संघाला सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. संपूर्ण राज्यभर प्रत्येक जिल्ह्यात पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष, स्थानिक पदाधिकारी उमेदवारांच्या भेटी घेत आहेत. राज्यातील १०० उमेदवारांना पत्रकार संघ निवेदन देणार आहे. अशी माहिती महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

# कल्याणशेट्टी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची मतदार जनजागृती प्रबोधन फेरी

## राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभागाचा उपक्रम



अक्कलकोट/प्रतिनिधीः लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान करा,मतदान तुमचा हक्क आहे, तुमच्या एका मतावर सरकारचे भवितव्य अवलंबून असते, मतदानाचे पवित्र कर्तव्य पार पाडा अशी आर्त हाक मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृती अभियानाच्या निमित्ताने नागरिकांना दिली. महर्षी विवेकानंद समाज कल्याण संस्था,अक्कलकोट संचलित कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभागाच्या वतीने मतदानाचा टक्का वाढण्यासाठी मतदान जनजागृती प्रबोधन फेरीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाधिकारी प्रा. राजेश पवार व प्रा. शितल झिंगाडे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले हन्नूर रोड परिसरातील कल्याणशेट्टी महाविद्यालया पासून प्रबोधन फेरीचे आयोजन करण्यात आले होते. एस टी स्टँड, कारंजा चौक, बाजारपेठ व स्वामी समर्थ मंदिर आदी परिसरात विद्यार्थ्यांनी मतदानाचे महत्त्व नागरिकांना समजावून सांगितले. ठिकठिकाणी मतदार स्त्री-पुरुषांनी विद्यार्थ्यांच्या या अभिनव उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी विद्यार्थिनी प्रबोधन पर फेरीत सहभाग नोंदवला.

या मतदान प्रबोधन फेरीचे आयोजन केल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी, ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, पुनम कोकलगी, रूपाली शहा, मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

### मतदान प्रबोधन बोर्ड, ड्रेस कोड, घोषणाबाजी व कौतुक

कल्याणशेट्टी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृती प्रबोधन फेरीत राष्ट्रीय सेवा योजनेचा ड्रेस कोड परिधान केला होता. तसेच हातात बोर्ड घेऊन एसटी स्टँड परिसरात घोषणाबाजी देखील केली. यावेळी मुंबई पुण्याकडे जाणाऱ्या प्रवाशांनी विद्यार्थ्यांच्या घोषणाबाजीस प्रतिसाद दिला आणि कौतुक देखील केले..

# दुधनी येथे युवा मुस्लिम संघटनेचा वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन



दुधनी/प्रतिनिधीः अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथे मुस्लिम युवा संघटना कडून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ व्या जयंती साजरा करण्यात आली. प्रारंभी माजी सभापती प्रथमेश म्हेत्रे यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचा पूजा करण्यात आली.या प्रसंगी प्रथमेश मालक म्हेत्रे,तलाठी वाघमारे , रिपाइं सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी यांच्या समयोचित भाषणे झाली.सदर कार्यक्रमास प्रथमेश म्हेत्रे,सैदप्पा झळकी,राहूल वाघमारे,गोरखनाथ धोडमनी,तोलासाब गुलबर्गा, अल्लाऊद्दिन नदाफ,काशिनाथ लोड्डे,तम्मणप्पा कोटनूर,रामा बसवनकेरी,कासु बसवनकेरी,नजीर शेखजी, खुतूब मातोळी,मेहदीमिया जिडगे,गौतम झळकी,निंगप्पा निंबाळ, शकील नदाफ,मोसिन मोमीन,असलम जावळे ,अहमद शिक्कलगार,सैपन मकानदार,हसन शेखजी, साहिल शेखजी ,अकबर अत्तार ,समिर शिकलगार,आजम शेखजी आदी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संचलन मुस्लिम युवाक संघटनेचे अध्यक्ष आजमशेख यांनी तर मेहेदिमिंया जिडगे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतली.

# माढा लोकसभेचे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार रमेश बारस्कर यांची भीमशक्ती संघटनेच्या कार्यालयात सदिच्छा भेट



पंढरपूर/प्रतिनिधीः माढा लोकसभे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार रमेश बारस्कर यांनी सांगोला येथे जाऊन भीमशक्ती संघटनेच्या कार्यालयास सदिच्छा भेट दिली माढा लोकसभेचे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार रमेश बारस्कर यांनी भीमशक्ती संघटनेच्या सांगोला येथील कार्यालयास सदिच्छा भेट दिली व संघटनेची संस्थापक अध्यक्ष विजय बापू बनसोडे यांनी यांच्यासह संघटनेच्या प्रमुख पदाधिकारी यांच्या समवेत निवडणुकी संदर्भात चर्चा केली

यावेळी संघटनेच्या वतीने उमेदवार रमेश बारस्कर यांचा येथे सन्मान करण्यात आला

यावेळी भीमशक्ती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विजय बापू बनसोडे तालुका अध्यक्ष संतोष साठे व इतर पदाधिकारी कार्यकर्ते तसेच वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

# मंदिर समितीस नागपूर येथील भाविकाकडून १ लक्ष रूपयाची देणगी



पंढरपूर/प्रतिनिधीः स्व. सुधा मोतीराम मावदेकर यांचे स्मरणार्थ शरयू सर्वनन आय्यर यांच्या तर्फे श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीस १ लक्ष रूपयाची देणगी दिली आहे. त्याबद्दल त्यांचा विभाग प्रमुख श्री.पांडूरंग बुरांडे यांच्या शुभहस्ते श्रींची प्रतिमा व उपरणे देऊन यथोचित सन्मान केला. त्यावेळी कर्मचारी श्री योगेश कागदे व श्री वैभव तुरेवाले उपस्थित होते. श्री आय्यर हे पार्वती नगर, नागपूर येथील रहिवाशी आहेत. त्यांनी आज धनादेशाद्वारे मंदिर समितीस देणगी दिली आहे.सद्यस्थितीत, चैत्री यात्रेचा कालावधी सुरू असून, भाविकांची गर्दी वाढत आहे. देणगी घेण्यासाठी जादा स्टॉलची निर्मिती, ऑनलाईन देणगीसाठी ट्ठ उजञ्ए, ठढ्न्क्ष्ठ ची सुविधा उपलब्ध असून, देणगीसाठी इच्छुक भाविकांनी श्री संत तुकाराम भवन येथील कार्यालयास संपर्क साधावा असे विभाग प्रमुख श्री पांडूरंग बुरांडे यांनी सांगीतले.

# सर्व कार्यालयांनी त्रैमासिक विवरणपत्र सादर करण्याचे आवाहन

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर जिल्ह्यातील सेवायोजन कार्यालये (रिक्तपदे अधिसुचित करणेची सक्ती करणारा )कायदा १९५९ व तयाखालील नियमावली १९६० मधील कलम ५(१) (शासकीय आस्थपनांसाठी ),५(२) (खाजगी आस्थापनांसाठी ) नुसार सोलापूर जिल्ह्यातील सार्वजनिक, खाजगी क्षेत्रातील आस्थपनांनी त्यांच्याकडे काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांची माहिती पुरूष /स्त्री एकुण (त्रैमासिक विवरणपत्र ई आर १ ) स्थानिक सेवायोजन कार्यालयास ऑनलाईन सादर करणे कायद्याने बंधनकारक आहे. अशा प्रकारची प्राप्त होणारी सांख्यिकी माहिती महाराष्ट्रशासन व केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालय, नवी दिल्ली यांचे कडे दर तिमाहि पाठवली जाते . तरी सदर त्रैमासिक विवरणपत्र (ईआर१) ३० एप्रिल २०२४ पर्यंत ऑनलाईन https://roigar.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलवर करणे आवश्यक आहे.या वेबपोर्टलवर त्रैमासिक विवरणपत्र ईआर १ हे प्रत्येक तिमाही संपलयानंतर ऑनलाईन सादर करण्यासाठी प्रत्येक आस्थापनेचा युजर आयडी व पासवर्ड हे यापूर्वीच दिलेले आहेत त्याचा वापर करून भरण्यात यावा. याबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र , नॉर्थकोट , पार्कचौक सोलापूर (०२१७ २९५०९५६) या कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन कार्यालयाचे सहायक आयुक्त हणमंत नलावडे यांनी केले आहे

# केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले येत्या दि.१९ आणि २० एप्रिल रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदीं सोबत वर्धा,नांदेड आणि परभणी येथील प्रचार सभांना संबोधित करणार



मुंबई : रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री ना.रामदास आठवले हे येत्या दि.१९ आणि २० एप्रिल रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सोबत वर्धा,नांदेड आणि परभणी या लोकसभा मतदार संघात महायुतीच्या प्रचार सभांना सबोधित करणार आहेत.भाजप प्रणित महायुतीच्या सर्व उमेदवारंना ना.रामदास आठवले यांच्या नेतृत्वातील रिपब्लिकन पक्षाचा जाहिर पाठिंबा देण्यात आलेला आहे.अबकी बार चारशे पार चा नारा यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्रातुन महायुतीचे ४५ पेक्षा जास्त खासदार निवडूण देण्यासाठी रिपब्लिकन पक्ष सुध्दा कंबर कसून महायुतीच्या प्रचाराला लागला आहे.

परभणी लोकसभा मतदार संघात रासप चे अध्यक्ष आणि महायुतीचे उमेदवार महादेव जाणकर यांच्या प्रचारासाठी दि.२०एप्रिल रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सोबत ना.रामदास आठवले परभणीत प्रचार सभेला संबोधित करणार आहेत.दि.१९ रोजी वर्धा मतदार संघाचे भाजप प्रणित महायुतीचे उमेदवार रामदास तडस यांच्या प्रचारासाठी वर्धा येथे आयोजित केलेल्या जाहिर सभेत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सोबत ना.रामदास आठवले उपस्थित राहणार आहेत.२०एप्रिल रोजी नांदेड येथे ही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सोबत भाजप महायुतीचा ना.रामदास आठवले प्रचार करणार आहेत.

# बार्टी यु.पी.एस.सी.प्रशिक्षण केंद्रात १८ तास अभ्यास अभियानाद्वारे महामानवांना अभिवादन



पुणे : डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे मार्फत येरवडा येथे निवासी यु.पी.एस.सी. प्रशिक्षण केंद्र सुरु आहे. क्रांतीज्योती महात्मा फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्त बार्टी मार्फत समता सप्ताह २०२४ अंतर्गत बार्टी संस्थेचे मा. महासंचालक सुनिल वारे व विस्तार व सेवा आयबीपीएस विभाग प्रमुख डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण यांच्या मार्गदर्शखाली विविध उपक्रम राबविले जात आहेत.

दिनांक १७ एप्रिल रोजी बार्टी यु.पी.एस.सी. प्रशिक्षण केंद्र येरवडा संकुल बार्टी येथे १८ तास अभ्यास अभियानद्वारे महामानवांना अभिवादन करण्यात आले. सकाळी ६ ते रात्री १२ वाजे पर्यंत विद्यार्थ्यांनी अभ्यास करून अभिवादन करणे हा नावीन्य पूर्ण उपक्रमाची सुरुवात बार्टी संस्थेमध्ये करण्यात आली. सकाळी सहा वाजता यु.पी.एस.सी प्रशिक्षण केंद्राचे सहाय्यक प्रकल्प व्यवस्थापक श्री. विकास गायकवाड यांनी आनापान व मंगल मैत्री सत्राची सुरुवात केली. यावेळी श्री. विकास गायकवाड प्रकल्प व्यवस्थापक डॉ प्रेम हनवते ग्रंथपाल श्री. विनायक भालेराव वसतिगृह अधीक्षक श्री. रणजित पात्रे, श्री रामदास लोखंडे,प्रशिक्षणार्थी सोनाली गायकवाड, श्री. योगेश वायदंडे यांच्या हस्ते महात्मा ज्योतिराव फुले आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून सर्व प्रशिक्षणार्थींनी अभिवादन केले व १८ तास अभ्यास अभियानाची सुरुवात करण्यात आली.